# अशोकराव माने शैक्षणिक संकुल
# राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत सर्वप्रथम

खोची / वार्ताहर : वाठार येथील अशोकराव माने शैक्षणिक संकुलामध्ये अंतिम वर्ष बी.ई. सिव्हील चा विद्यार्थी गणेश ज्ञानदेव लोळगे आंतरमहाविद्यालयीन राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेमध्ये प्रथम आला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा 'सर्वोत्कृष्ठ महाविद्यालय' पुरस्कार मिळालेल्या बारामती येथील "कला विज्ञान व वाणिज्य" महाविद्यालयाच्या मराठी विभागाने सदरच्या स्पर्धा आयोजित केल्या होत्या. भारताचे माजी कृषिमंत्री शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त १२ व १३ डिसेम्बर २०१७ रोजी घेण्यात आलेल्या "प्रतिभा" स्पर्धेमध्ये सुमारे २५० हून अधिक प्रतिभावंत विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

अशोकराव माने शैक्षणिक संकुलाच्या गणेश लोळगे याने "साहित्यातील निर्भय मुद्रा - विं. दा. करंदीकर" या विषयावर उत्कृष्ठ असे भाष्य करून उपस्थितांची मने जिंकली. स्पर्धकाची भाषा शैली, विचारांमधील प्रगल्भता, वैचारिक पातळी व स्पष्टता, सामालोचानातील खोली अश्या निकषांवर गणेश लोळगे याने केलेल्या भाषणाचे स्पर्धांचे समन्वयक डॉ. भारत शिंदे व परीक्षक तज्ञांनी विशेष कौतुक केले असल्याची माहिती संस्थेचे कार्यकारी संचालक डॉ. दीपक मुद्गल यांनी दिली. गणेश लोळगे यांच्या यशासाठी डॉ. सचिन पाटील तसेच प्रा. सुहास सपाटे यांचे मार्गदर्शन लाभले.

अशोकराव माने शैक्षणिक संकुलामधील उपलब्ध अदययावत शैक्षणिक पायाभूत सुविधा, अनुभवी व कुशल प्राध्यापक वृंद तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता देण्यात येणाऱ्या विविध प्रशिक्षणामुळे दिवसेंदिवस संस्थेचा सर्वांगीण विकास होत असून विद्यार्थ्यांना राज्य तसेच देश पातळीवर विविध स्पर्धामध्ये घवघवीत यश मिळत आहे अशी माहिती डॉ. दीपक मुदगल यांनी दिली. विद्यार्थ्यांचे यश हेच संस्थेचे यश असल्याने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अधिकाधिक पायाभूत सुवीधा उपलब्ध करून देण्याची संस्थेची परंपरा यापुढेही अधिक समृद्ध होईल अशी ग्वाही याप्रसंगी बोलताना संस्थेचे अध्यक्ष मा. विजयसिंह माने यांनी दिली.